नियमीत फौजदारी खटला क्र. **८४/२०२२**
निशाणी क्र. **३६/क**

**<u>कलम २६७(१) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**

**(दृक–श्राव्य प्रणालीद्वारे)**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रशांत सुभाष ढगे** |
| वय सुमारे | : | ५० वर्षे, |
| व्यवसाय | : | उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर, मुंबई |
| निवासस्थान | : | गव्हर्मेंट क्वार्टर्स, हाजी अली |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद एस्. पाटील यांचेमार्फत</u>:**

दि. १२/०७/२०२२ रोजी मी अलिबाग येथे उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत होतो. या केस संदर्भात बोर्ली, ता. मुरुड येथील प्रतिक कलगी व वैभव भोईर यांनी आमच्या कार्यालयाकडे तक्रार केली होती. सदर तक्रार ही गट क्रमांक ४९ चे मालक आगारजा यांनी भराव करुन कांदळवन नष्ट करुन खाडीतील पाण्याचा प्रवाह अडवला. सदर तक्रार तालुका स्तरीय कांदळवन समितीकडे पाठविण्यात आली. या समितीने दि. २४/०६/२०२२ रोजी जागेची स्थळपाहणी केली. आर.एफ.ओ. फणसाड अभयारण्य, बंदर निरीक्षक मेरीटाईम बोर्ड, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचे प्रतिनिधी, आर.एफ.ओ. मुरुड, नगर रचना विभागाचे प्रतिनिधी व मंडळ अधिकारी, बोर्ली यांनी स्थळपाहणी केली व तहसिलदार कार्यालयास अहवाल दिला. तहसिलदारांनी सदर अहवाल आमच्याकडे पाठविला. सदर अहवालाच्या आधारे मी सदर तक्रार दाखल केली.

०२. नगर रचना विभागाने आम्हाला अहवाल पाठविला. सदर जमीन ही बफर झोनमध्ये आहे असे अहवालामध्ये नमूद आहे. त्यानंतर मी फिर्याद दाखल केली. मला दाखवण्यात आलेली निशाणी क्र. १ कडील फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. जयप्रकाश मिठागरी यांचेमार्फत** :

उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०५/११/२०२५.** मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.